# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपति शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१ दुरध्वनी क्रमांक २५२९९३२


क्र.म.वि./ १२३५ दिनांक :२६/६/२०१७

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय:— सत्र २०१८—१९ चे निरंतर संलग्निकरण अर्ज सादर करण्याबबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांना/अभ्यासक्रमांना निरंतर संलग्निकरणाची मान्यता सत्र २०१७—१८ पर्यंतच आहे. अश्या महाविद्यालयांकरिता सत्र २०१८—१९ च्या निरंतर संलग्निकरणाकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ०१ ऑगस्ट २०१७ पासून लिंक सुरू करण्यात येत असून संबंधित महाविद्यालयांनी ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करून त्याच्या हार्ड कॉपीची एक प्रत विद्यापीठाच्या महाविद्यालय विकास विभागात जमा करावी. विद्यापीठाव्दारे निर्गमित **निर्देश क्र. ८२/२०१६** मधील तरतुदीनुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या निरंतर संलग्किरणाची प्रक्रिया ही शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी पुर्ण करून चालु सत्रात महाविद्यालयाला निरंतर संलग्निकरण आहे किंवा नाही तसेच सदर सत्रात विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे किंवा नाही याबाबतच्या सुचना सर्व संबंधीत महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र सुरू होण्यापुर्वी विद्यापीठाला देणे गरजेचे आहे.

करिता संबंधित महाविद्यालयांनी सत्र २०१८—१९ करिता ०१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत निरंतर संलग्निकरणाचा अर्ज ऑनलाईन न चुकता सादर करावा. **३१ ऑगस्ट २०१७ नंतर लिंक सुरू करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.**

आपला,

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव (अति.कार्य.)